.nagpur

# NMC e NEWS LETTER

डिसेंबर २०१८

GOOD BYE 2018

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात

### उघड्यावर झोपणाऱ्या बेघर निराधारांना दिला निवारा

नागपूर : थंडीच्या दिवसांमध्ये कुडकुडत उघड्यावर झोपणाऱ्या बेघर व निराधारांना मनपाच्या बेघर निवारा केंद्राचा मोठा आधार मिळाला आहे. महापालिका समाजकल्याण व पोलिसांच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या पुढाकाराने अशा बेघरांना पोलिस वाहनांतून बेघर निवाऱ्यापर्यंत सोडण्याची सोय करण्यात आली आहे. थंडीमुळे कोणाचाही जीव जाऊ नये, यासाठी महापालिका व पोलिसांच्या सामाजिक सुरक्षा विभागातर्फे संयुक्त उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे नागपूर शहरातील रेल्वे उड्डाणपूल, रस्ते, फुटपाथ, हॉटेल, खुले पटांगण, बसस्थानक, रेल्वेस्थानक याठिकाणी यापुढे बेघरांना उघड्यावर राहण्याची गरज पडणार नाही. निवारागृहात् पाणी, स्वच्छतागृह, गादी, चादर, ब्लँकेट आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. 'बेघर फ्री सिटी' अभियानाच्या यशस्वीतेकरीता मनपा अप्पर आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त डॉ. रंजना लाडे व गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक श्रीमती संखे, प्रमोद खोब्रागडे, विनय त्रिकोलवार, नूतन मोरे यांचेसह सामाजिक सुरक्षा पोलिस विभाग, मनपा समाज कल्याण विभाग तसेच स्वयंसेवी संस्थेचे कर्मचारी कार्य करीत आहेत.

### महाराष्ट्र ठरले महापौर चषकाचे मानकरी



नागपूर : नागपूर महानगरपालिका आणि कोशु-कुंग-फू-स्पोर्ट असोशिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ईश्वर देशमुख सभागृहात आयोजित महापौर चषक कोशु-कुंग-फू कराटे राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राने बाजी मारली आणि महापौर चषकावर आपले नाव कोरले. द्वितीय स्थान तेलंगाना तर तृतीय स्थान आसामने पटकाविले. बक्षीस वितरण कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नागपूर महानगरपालिकेचे क्रीडा सभापती नागेश सहारे, मनपाचे क्रीडा अधिकारी नरेश सवाईथूल, क्रीडा निरिक्षक नरेश चौधरी, कोशु-कुंग-फू-स्पोर्ट असोशिएशनचे अध्यक्ष डॉ. विनोद राऊत, आयोजन सचिव बाळासाहेब देसाई, श्रीमती ज्योत्स्ना राऊत, सुरेशबाबू चौधरी, हरिष चावला, वंदना श्रीखंडे, नीलेश शेंडे, स्वप्नील भैसारे, मनोहरराव मसाळ, विजय मदनकर, शोभा रहाटे, दिलीप मलिये, राजू शहा, प्रभाकर येवले उपस्थित होते. मागील दीड वर्षात अनेक राष्ट्रीय स्पर्धाचे आयोजन करून मनपाने क्रीडा क्षेत्रातील अनेक नामवंत खेळाडूंना नागपुरात आणले. यापुढेही अशा स्पर्धांच्या आयोजनासाठी मनपा पुढाकार घेईल, असेही त्या म्हणाल्या. क्रीडा सभापती नागेश सहारे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले. यानंतर सर्व विजेत्यांना सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदक देऊन गौरविण्यात आले. सदर स्पर्धेत महाराष्ट्र, तेलंगाना, दिल्ली, तामीळनाडू, आसाम या राज्यातील सुमारे ५०० खेळाडू सहभागी झाले होते.

### मेहाडिया चौकात केला वीजबचतीचा जागर

नागपूर : नागरिकांसाठी आज गरजेची बनलेल्या विजेची आज बचत केली नाही तर भविष्यात विजेची मोठी तूट पडेल. नागरिकांना वीज बचतीचे महत्त्व कळावे यासाठी नागपूर महानगरपालिकेने ग्रीन व्हिजीलच्या सहकार्याने काही वर्षांपूर्वीपासून सुरू केलेल्या पोर्णिमा दिवसाचे आयोजन शुक्रवारी (ता. २१) मेहाडिया चौकात करण्यात आले. येथील व्यापाऱ्यांमध्ये वीज बचतीचा जागर करत मनपा कर्मचारी आणि ग्रीन व्हिजीलच्या स्वयंसेवकांनी वीज बचतीसाठी नागरिकांना उद्युक्त केले.तत्कालिन महापौर आम्दार प्रा. अनिल सोले यांच्या प्रेरणेने प्रत्येक पोर्णिमेच्या उजेडच्या रात्री 'पोर्णिमा दिवस' हा उपक्रम राबविण्यात येतो. उपक्रमाचा शुभारंभ झाला तेव्हापासून या उपक्रमात सातत्य असून आजपर्यंत या उपक्रमातून लाखो यूनीट विजेची बचत झाली आहे. २१ डिसेंबर रोजी मेहाडिया चौकात 'पोर्णिमा दिवसा'चे आयोजन करण्यात आले होते. ग्रीन व्हिजील फाउंडेशनचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी आणि कार्यकारी अभियंता संजय जयस्वाल यांच्या नेतृत्त्वात स्वयंसेवकांनी अनावश्यक वीज दिवे एक तासाकरिता बंद करण्याचे आवाहन केले. प्रत्येक प्रतिष्ठानांमध्ये जाऊन रात्री ८ ते ९ या काळात किमान एक तासासाठी अनावश्यक विद्युत दिवे बंद ठेवण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी अनावश्यक विद्युत दिवे बंद केले आणि वीज बचतीच्या मोहिमेत आपला सहभाग नोंदविला.

## नागपुरातील सर्व प्रस्तावित प्रकल्पांच्या कामांना सुरुवात करा



नागपूर : शासकीय कागदोपत्री विविध मंजुरीसाठी अडलेले नागपुरातील सर्व 'ड्रीम प्रोजेक्ट'मधील अडीअडचणी तातडीने दूर करा. फेब्रुवारी २०१९ पूर्वी या सर्व प्रस्तावित प्रकल्पांचे भूमिपूजन होईल, असे उद्दिष्ट समोर ठेवून काम करा, असे निर्देश केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना दिले.नागपूर शहरातील विविध प्रस्तावित कामांची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी केंद्रीय परिवहन, महामार्ग, जहाजबांधणी, जलस्त्रोत व गंगाशुद्धीकरण मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (ता. २४) वनामती येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीत ते बोलत होते. बैठकीला राज्याचे ऊर्जामंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर नंदा जिचकार, आमदार सुधाकर कोहळे, आमदार कृष्णा खोपडे, उपमहापौर दीपराज पार्डीकर, स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा, माजी महापौर तथा ज्येष्ठ नगरसेवक प्रवीण दटके, महामेट्रोचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक बृजेश दीक्षित, विभागीय आयुक्त संजीवकुमार, जिल्हाधिकारी अश्विन मुदगल, मनपा आयुक्त अभिजीत बांगर, मध्य रेल्वेचे डीआरएम एम. एस. उप्पल, मनपाचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता उल्हास देबडवार, सार्वजनिक बांधकाम विभाग (महामार्ग)चे अधीक्षक अभियंता श्री. ठेंग, नागपूर स्मार्ट ॲण्ड सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रामनाथ सोनवणे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे एम. चंद्रशेखर उपस्थित होते. सर्वप्रथम नामदार नितीन गडकरी यांनी केंद्रीय मार्ग निधीअंतर्गत सुरू असलेल्या कामांची सद्यस्थिती जाणून घेतली. जुना भंडारा रोड-मेयो हॉस्पीटल ते सुनील हॉटेलपर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण, तेथील भूसंपादनाची सद्यस्थिती, केळीबाग रोड रुंदीकरण आणि भूसंपादनाबाबतची सद्यस्थिती, जयस्तंभ चौक ते मानस चौक रस्त्याच्या विकासाचा प्रस्ताव, वंजारी नगर पाण्याची टाकी ते अजनी रस्त्याला जोडणारा डी.पी. रोड आदींमधील अडचणी तातडीने दूर करून जानेवारी महिन्यापर्यंत भूसंपादन कार्यवाही पूर्ण होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे निर्देश ना. गडकरी यांनी दिले. नागपूर शहरात विविध ठिकाणी रेल्वे उड्डाण पुलाची जी कामे रेल्वे विभागाच्या आडकाठीमुळे अडलेली आहेत त्यातील अडथळा रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन तातडीने दूर करण्याचे निर्देश ना. गडकरी यांनी दिले. नागनदी पुनरुज्जीवन प्रकल्पाबाबत मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी माहिती दिली. सप्टेंबर २०१९ पर्यंत जिकाकडून मिळणाऱ्या कर्ज करारावर स्वाक्षरी होऊन डिसेंबर २०१९ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

## 'हेल्थ रन'मधील विजेत्यांना पुरस्कार प्रदान



नागपूर : नागपूर महानगरपालिका व केंद्रीय आयुर्वेदीय विज्ञान अनुसंधान परिषद नवी दिल्ली द्वारा संचालित क्षेत्रिय आयुर्वेदीय मातृ व शिशु स्वास्थ अनुसंधान संस्थानच्या वतीने तिसऱ्या आयुर्वेद दिनाचे औचित्य साधून ४ नोव्हेंबरला आयोजित 'हेल्थ रन' (आयुर्वेदा दौड स्वास्थ की ओर) मधील विजेत्यांना शुक्रवारी (ता. ३०) पुरस्कार प्रदान करण्यात आले. शहरातील के.डी.के. महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित समारंभामध्ये विजेत्यांना पुरस्कार वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून व्ही.एनआयटीचे चेअरमन विश्राम जामदार, स्टेट बँक ऑफ इंडियाचे उपव्यिवस्थापक एम.व्हीम.आर. रवीकुमार, क्षेत्रीय आयुर्वेदीय मातृ व शिशु स्वास्थ अनुसंधान संस्थानचे प्रभारी अनुसंधान अधिकारी डॉ. आर. गोविंद रेड्डी, अनुसंधान अधिकारी डॉ. सविता शर्मा, डव्हेन्चर ॲण्ड यू चे संचालक मितेश रांबिया, नागपूर मेट्रोचे एस. शिवमथन, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे शैलेंद्र दडवी उपस्थित होते. आयुर्वेदाबाबत जनजागृतीच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या 'हेल्थ रन'मध्ये महिला व पुरुषांच्या विविध गटामध्ये ८ व ५ किमी अंतरासाठी ही स्पर्धा घेण्यात आली होती. स्पर्धेमध्ये नागपूरातील क्रीडाप्रेमींनी उत्स्फुर्त प्रतिसाद दर्शविला होता.

**हेल्थ रन निकाल** : (प्रथम तीन स्थानांवरील विजेते) ८ किमी महिला (१५ वर्षाखालील) : भक्ती पटेल, गार्गी बनोते, अश्लेषा निमजे. (१६ ते ४५ वर्ष वयोगट) : सौजन्या अरले, अयेशा सय्यद, तारिका दांडेकर. ८ किमी पुरूष (५ ते १५ वर्ष वयोगट) : अनिरुद्ध गुप्ता, शौर्य कुमार. (१६ ते ४५ वर्ष वयोगट) : प्रवीण रायबोले, शुभम लवांदे, मनिष बर्वे. (४६ वर्षावरील) : रवींद्र बालपांडे, डॉ. संजय अडगोणकर, डॉ. दिवाकर भोयर. ५ किमी महिला (५ ते १५ वर्ष वयोगट) : विधी गटलेवार, धनश्री नानोटकर. (१६ ते ४५ वर्ष) : टिना बालपांडे, चैताली दोरखडे, शितल भगत. (४६ वर्षावरील) : डॉ. सुरेखा वानखेडे, रेखा प्रसाद, मंदा धाडसे. ५ किमी पुरूष (५ ते १५ वर्ष) : धैर्य गुधाडे, ओम गटलेवार, पार्थ सुकारे. (१६ ते ४५ वर्ष) : शुभम मारबते, दिनेश चव्हाषण, स्वप्नील सलामे. (४६ वर्षावरील) : धनराज चौरपगार, साहेबराव सांबरे, मो. मासूम जाफर.



## समस्या सोडविण्यासाठीच नागरिकांशी संवाद : महापौर नंदा जिचकार

नागपूर : शहरातील नागरिकांना रोजच मुलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. पाणी, गडर लाईन, अतिक्रमण, सिवर लाईन, कचरा तसेच इतर सुविधा प्रदान करण्यासाठी नागपूर महानगरपालिका सदैव कटिबद्ध आहे. दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या मुलभूत सुविधांबाबतच्या समस्या तातडीने सोडविता याव्यात यासाठीच नागरिकांशी संवाद साधून त्यावर कार्यवाही करण्यात येत आहे, असे महापौर नंदा जिचकार यांनी नागरिकांसोबत चर्चा करताना सांगितले.'महापौर आपल्या दारी' उपक्रमांतर्गत शनिवारी (ता. २९) महापौर नंदा जिचकार यांनी गांधीबाग झोनमधील प्रभाग क्रमांक १९ आणि २२ येथील समस्यांचा आढावा घेतला. यावेळी वैद्यकीय सेवा व आरोग्य समिती सभापती मनोज चापले, गांधीबाग झोन सभापती वंदना यंगटवार, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, राजेश घोडपागे, नगरसेविका सरला नायक, श्रद्धा पाठक, उपायुक्त राजेश मोहिते, कार्यकारी अभियंता (स्लम) राजेंद्र रहाटे, सहायक आयुक्त अशोक पाटील, आरोग्य अधिकारी (स्वच्छता) डॉ. सुनील कांबळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महापौर नंदा जिचकार यांनी गांधीबाग झोनमधील बजेरीया प्लॅटफॉर्म शाळा, मच्छी बाजार, टाटा पारसी शाळा, क्रेटा कॉलनी, देवाडिया रुग्णालय, कोलबास्वामी चौक, फवारा चौक, जुनी मंगळवारी आदी ठिकाणी भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. प्रारंभी महापौर नंदा जिचकार यांनी बजेरिया येथील प्लॅटफॉर्म शाळेमध्ये नागरिकांच्या समस्या जाणून त्यांचे निराकरण केले. झोनमधील पोद्दारेश्वर राम मंदिराजवळील पुलाखाली खोदकाम करण्यात आले असून अनेक दिवसांपासून मलबा तिथेच पडून असल्याची तक्रार यावेळी नागरिकांनी केली. यासंदर्भातही त्यांनी योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. यावेळी महापौरांनी मच्छी बाजाराची पाहणी करून परिसरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. परिसरात असलेल्या वाईन शॉपमुळे येथे असामाजिक तत्वांचा वावर असतो. रस्त्यावर नागरिकांच्या गाड्यांची गर्दी असते त्यामुळे ये-जा करण्यास त्रास होतोच शिवाय महिलांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण होत आहे. या परिसरातील वाईन शॉप हटविण्याची मागणी येथील महिलांनी केली. संबंधित दुकानाची नियमानुसार चौकशी करून जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविण्यात येणार असल्याचे महापौरांनी यावेळी आश्वासित केले.

## सक्करदरा तलाव स्वच्छतेचे काम प्राधान्याने पूर्ण करा

आयुक्त अभिजीत बांगर यांचे निर्देश



नागपूर : सक्करदरा तलावाच्या पाण्यात झालेली जलपर्णी काढण्यासाठी स्वयंसेवी संस्थेने घेतलेल्या पुढाकाराला महानगरपालिकाही बळ देईल. या कामावर मनपाचे कर्मचारी वाढवून देण्यात येईल. लवकरात लवकर हे काम पूर्ण करा, असे निर्देश मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी नेहरूनगर झोनच्या अधिकाऱ्यांना दिले. आमदार सुधाकर कोहळे यांच्या पुढाकारातून क्लिन फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेने सक्करदरा तलावातील जलपर्णी काढून तलाव स्वच्छ करण्याचा संकल्प केला. २२ डिसेंबर रोजी या कार्याचा श्रीगणेशाही झाला. आतापर्यंत सुमारे ५० ट्रक जलपर्णी व कचरा तलावातून काढण्यात आला. या कार्यासाठी क्लिन फाऊंडेशन शक्य तेवढे सहकार्य करीत आहे. मात्र, यासाठी काही निधीची मागणी आमदार सुधाकर कोहळे यांनी नागपूर महानगरपालिकेकडे केली होती. मात्र, अद्यापही तो निधी मिळाला नाही. यासंदर्भात जाणून घेण्यासाठी आणि कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आमदार कोहळे यांनी मनपा आयुक्तांसह सक्करदरा तलावाची शुक्रवारी (ता. २८) पाहणी केली. यावेळी निधीसंदर्भातील खंत त्यांनी बोलून दाखविली. सोबतच जलपर्णी काढण्यासाठी आवश्यक मशिनरी, हातमोजे व अन्य साहित्य मनपाने पुरवावे, असेही सांगितले. यावर मनपा आयुक्तांनी सहमती दर्शवित महानगरपालिकेचीही २६ कर्मचाऱ्यांची टीम या कामावर दिली असल्याचे सांगितले. संबंधित निधी शुक्रवार सायंकाळपर्यंत मिळेल, असे आश्वासन दिले. आमदार सुधाकर कोहळे यांनी यावेळी मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांना सक्करदरा तलावाबाबत माहिती दिली. तलावाच्या सौंदर्यीकरणासाठी काही वर्षांपूर्वी दीड कोटींचा निधी मंजूर झाला होता. त्यापैकी ४० लक्ष रुपये नासुप्रला प्राप्त झाले होते. त्यातून तलावाच्या भिंतीचे कार्य करण्यात आले. तलावाच्या सौंदर्यीकरणाचा एक प्रस्ताव पुन्हा तयार केला असून पूर्वीचा उर्वरीत निधी मिळून सुमारे एक कोटी १० लाख रुपये यासाठी खर्च अपेक्षित आहे. ९ जानेवारी रोजी यासंदर्भात बैठक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तलावाच्या एका बाजूच्या खचलेल्या भिंतीची डागडुजी यासह एक-दोन कामे मनपाने तातडीने करून द्यावी, असेही सुधाकर कोहळे यांनी म्हटले.

## महानगरपालिका आणि महा मेट्रोमध्ये सामंजस्य करार

नागपूर : जगातील प्रसिद्ध 'लंडन स्ट्रीट'च्या धर्तीवर नागपूर शहरात तयार होणाऱ्या 'ऑरेंज सिटी स्ट्रीट'च्या प्रस्तावित जागेवर (भूखंड क्रमांक १) आता आकर्षक मेट्रो मॉल तयार करण्यात येणार आहे. महा मेट्रो नागपूर प्रकल्पाच्या जयप्रकाश मेट्रो स्टेशनसमोर हा मेट्रो मॉल तयार होणार आहे. यासाठी आज गुरुवार, २० डिसेंबर रोजी नागपूर महानगर पालिका आणि महा मेट्रो नागपूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. सिव्हील लाईन स्थित मेट्रो हाऊस मध्ये झालेल्या मनपा आणि महा मेट्रो यांच्या संयुक्त बैठकीत महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित आणि महानगर पालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी करारावर स्वाक्षरी केली.यावेळी महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त अभिजीत बांगर यांच्यासह स्थायी समितीचे सभापती वीरेंद्र कुकरेजा, नगरसेवक तथा नासुप्रचे विश्वस्त भूषण शिंगणे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, उपायुक्त राजेश मोहिते, अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, कार्यकारी अभियंता नरेश बोरकर उपस्थित होते. गुणवत्ता आणि कामाचा अवाका बघता महा मेट्रो नागपूरला शहरातील महत्त्वाच्या प्रकल्पांचे काम हस्तांतरित करण्यात आले आहे. केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या स्मार्ट सिटी संकल्पने अंतर्गत ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पाचे निर्माण होणार आहे. याअंतर्गत 'मेट्रो मॉल' व नागपूर शहरातील इतर विविध विकास कामे महा मेट्रोच्या माध्यमातून होणार आहे. यात पर्यटनाच्या दृष्टीने फुटाळा परिसर पुनर्निर्माण आणि रेल्वे स्टेशन समोररील रस्त्याचे पुनः बांधकाम महा मेट्रो करणार आहे. रेडिसन ब्ल्यू हॉटेल समोर हा मॉल तयार करण्यात येणार आहे. मेट्रो मॉलचे बांधकाम पूर्ण होताच हा मॉल महानगर पालिकेला सुपूर्द करण्यात येईल. महत्त्वाचे म्हणजे जयप्रकाश नगर मेट्रो स्टेशन प्रास्तवित मॉलच्या तिसऱ्या माळ्यावर जोडण्यात येणार आहे. प्रस्तावित ३३०० चौरस मीटर जागेवर हा तयार होणार आहे. मॉलचे एकूण बांधकाम क्षेत्र १० हजार चौरस मीटर असेल. सुमारे ४५ मीटर उंच असलेल्या या मेट्रो मॉल मध्ये एकूण आठ मजले यात असणार आहे. जयप्रकाश नगर मेट्रो स्टेशन समोर ऑरेंज सिटी स्ट्रीट प्रकल्पाच्या प्रस्तावित जागेवर (भूखंड क्रमांक १) हा मॉल असेल. एकूणच हा 'ऑरेंज सिटी प्रोजेक्ट' एकूण ३०.४९ हेक्टर इतक्या क्षेत्रफळात असून यात विविध विकास कामे करण्याचे आयोजित आहे. मॉलच्या चौथ्या माळ्यावर दुकानांसाठी तर पाचव्या आणि आठव्या मजल्यावर कार्यालयासाठी जागा आरक्षित करण्यात आली आहे. यात दुकानासाठी १७३५ चौरस मीटर तर कार्यालयासाठी ३२०० चौरस मीटर कार्पेट एरिया असेल. तसेच प्रस्तावित मेट्रो मॉल मध्ये पार्किंगसाठी दोन बेसमेंट ची सुविधा करण्यात येणार आहे. एकूण ४९ लहान चार चाकी वाहन, ९८ दुचाकी वाहन आणि सायकली एकाच वेळी याठिकाणी पार्क करता येणार आहे.

# जबाबदारीने काम करा, नागरिकांच्या समस्यांना प्राधान्य द्या : पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे




नागपूर : प्रत्येक नागरिकाला स्वच्छ पाणी, चांगले रस्ते, परिसरात स्वच्छता मिळणे हा त्यांचा हक्क आहे. याच समस्या घेउनही नागरिक शासन दरबारी आपली कैफीयत मांडतात. वरवरून छोट्या वाटणा–या या समस्या सर्वसामान्य नागरिकांसाठी रोजच्या जगण्याचा संघर्ष आहेत. शासन प्रत्येक समस्यांसाठी निधी उपलब्ध करून देण्यास तयार आहे. मात्र यासाठी प्रशासनाने आपली उदासीनता झटकण्याची गरज आहे. नागरिकांची सेवा करण्याची आपल्याला संधी मिळाली असून प्रत्येक काम जबाबदारीने करा व नागरिकांच्या प्रत्येक लहानात लहान समस्यांना प्राधाने देउन ती तातडीने सोडविली जाईल यासाठी काम करा, असा सूचक इशारा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिका–यांना दिला.नागपूर शहरातील जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी, त्यांच्या समस्या व अडचणी जाणून घेण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महापालिका झोननिहाय जनसंवाद कार्यक्रमाचे नियोजन केले आहे. याच नियोजनांतर्गत सोमवारी (ता. २४) सतरंजीपुरा झोनमध्ये 'जनसंवाद' केला. यावेळी ते बोलत होते. मंचावर महापौर नंदा जिचकार, आमदार कृष्णा खोपडे, डॉ. मिलींद माने, उपमहापौर दीपराज पार्डीकर, आयुक्त अभिजीत बांगर, सतरंजीपुरा झोन सभापती यशश्री नंदनवार, परिवहन समिती उपसभापती प्रवीण भिसीकर, नगरसेवक रमेश पुणेकर, नितीन साठवणे, संजय चावरे, महेश महाजन, नगरसेविका अभिरूची राजगिरे, शकुंतला पारवे, आभा पांडे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, सहायक आयुक्त प्रकाश वराडे यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख व विविध शासकीय कार्यालय, तसेच ओसीडब्ल्यू, एसएनडीएलचे पदाधिकारी उपस्थित होते. नागरिकांच्या मुलभूत सुविधांसाठी निधीची आवश्यकता असल्यास तात्काळ सांगा, शासनाकडून तो ताबडतोब उपलब्ध करून देण्यात येईल. सतरंजीपुरा झोनमध्ये पाणी, गडर लाईनची समस्या सर्वत्र प्रामुख्याने दिसून येते. उन्हाळ्यात याची झळ जास्तच बसणार आहे. हे ओळखून आतापासून संपूर्ण विहीरींची स्वच्छता करणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी बोअरवेल निर्माण करण्याचे निर्देशही पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी दिले. आयुष्यमान योजना, सर्वांना अन्न योजनेसाठी नगरसेवकांनी पुढे या गरीब लोकांसाठी शासनाने अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. शासनाच्या आयुष्यमान योजनेद्वारे नागरिकांचा विमा काढण्यात येत आहे. या द्वारे कॅन्सर, किडनी, यकृत, ह्रदयाशी संबंधित आजारावर उपचाराचा पाच लाख रुपयांचा विमा काढला जात आहे. त्यामुळे योग्य उपचार मिळून अनेकांचे प्राण वाचणार आहेत. याशिवाय सर्वांना नेहमी अन्न मिळावे यासाठी सर्वांना अन्न पुरवठा या योजनेद्वारे ऑनलाईन प्रक्रिया केली जाणार आहे. या योजनेद्वारे केशरी शिधापत्रिका धारकांना आरसीआयडी क्रमांक ऑनलाईन करावे लागणार आहे. या दोन्ही योजनांचा नागरिकांना पुरेपुर लाभ मिळावा यासाठी प्रत्येक नगरसेवकांनी आपापल्या प्रभागातील नागरिकांना भेटून विमा काढणे तसेच प्रभागातील रेशन दुकानांमध्ये जावून ऑनलाईन करण्यासाठी शिबिर घेण्याचे आवाहनही यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केले.

## थोडक्यात...

### 'स्वच्छता मित्र' व्हा... शहर स्वच्छतेचे भागीदार बना!



नागपूर : स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१९ मध्ये नागपूर शहर सहभागी झाले आहे. नागपूर महानगरपालिकेच्या खांद्याला खांदा लावून जनजागृती मोहिमेत सहभागी व्हावे आणि स्वच्छ सर्वेक्षण मोहिमेचा भाग बनावे, असे आवाहन महापौर नंदा जिचकार यांनी केले आहे. याच आवाहनाला प्रतिसाद देत नागपुरातील तेजस्विनी महिला मंचच्या सदस्यांनी 'स्वच्छता मित्र' बनण्यात पुढाकार घेतला. याच महिला मंचच्या श्रीमती किरण मुंदडा आणि श्रीमती कल्पना मोहता यांनी पहिले 'स्वच्छता मित्र' होण्याचा मान पटकाविला. महाल येथील राजे रघुजी भोसले नगर भवन येथे महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते दोन्ही स्वच्छता मित्रांना ओळखपत्र देण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नगरसेवक सुनील अग्रवाल, स्वच्छ भारत अभियानाचे नोडल अधिकारी डॉ. प्रदीप दासरवार उपस्थित होते. यावेळी श्रीमती किरण मुंदडा म्हणाल्या, नागपूर महानगरपालिकेसोबत स्वच्छता अभियानांतर्गत जनजागृतीचे कार्य करणे हा आमचा बहुमान आहे. मनपाच्या स्वच्छताविषयक कुठल्याही मोहिमेत आमचा सहभाग राहील. हे माझे शहर आहे, ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात निर्माण झाली तर अशा मोहिम राबविण्याची गरजच पडणार नाही. प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखावी आणि शहर स्वच्छ आणि सुंदर राखण्यास सहकार्य करावे असे आवाहन स्वच्छता मित्र किरण मुंदडा यांनी केले.

### लक्ष्मीनगर झोनअंतर्गत असलेल्या झाडांवरील फलके काढली

नागपूर : नागपूर महानगरपालिका उद्यान विभागाने सुरू केलेल्या मोहिमेअंतर्गत गुरूवारी (ता. २०) लक्ष्मीनगर झोनअंतर्गत असलेल्या विविध झाडांवरील जाहिरात फलके कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी काढली. झाडांवर जाहिरात फलके लावणाऱ्या सुमारे ४४ जणांना मनपाच्या कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनने ही मोहीम हातात घेतली आहे. पहिल्या टप्प्यात धरमपेठ झोनमध्ये राबविण्यात आलेल्या मोहिमेनंतर आज गुरूवारी लक्ष्मीनगर झोनमधील झाडांवरील फलके काढण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. उद्यान विभागाचे कर्मचारी, लक्ष्मीनगर झोनचे कर्मचारी आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनच्या स्वयंसेवकांनी लक्ष्मीनगर झोन कार्यालय ते श्रद्धानंदपेठ, माटे चौक ते प्रतापनगर चौका दरम्यान असलेल्या झाडांवरील सुमारे ४४ फलके काढलीत. झाडांवर जाहिरात फलक लावून त्यांना इजा करणे हे महाराष्ट्र प्रोटेक्शन ॲण्ड प्रिझर्व्हेशन ऑफ ट्री क्ट १९७५ अंतर्गत गुन्हा आहे. अशी फलके लावणाऱ्या ४४ लोकांना नोटीस पाठविण्यात येणार असल्याचे उद्यान विभागाचे सल्लागार सुधीर माटे यांनी सांगितले. झाडांना खिळे ठोकल्यामुळे ज्या भागातून झाडांचे अन्न आणि पाणी प्रवाहित होते त्या भागाला इजा होते. इतकेच नव्हे तर झाड सडते. त्यामुळे झाडांवर जाहिरात फलक लावू नये, असे ते म्हणाले. शहरात ज्यांनी झाडांवर अशा प्रकारची जाहिरात फलके लावलेली आहेत त्यांनी ती तातडीने काढावीत, असे आवाहन उद्यान विभागातर्फे यावेळी करण्यात आले. लक्ष्मीनगर झोनअंतर्गत राबविण्यात आलेल्या मोहिमेमध्ये उद्यान विभागाचे सल्लागार सुधीर माटे, नंदकिशोर शेंडे, गुणवंत पिंपळकर, संदीप सेलोकर, प्रणय गोंडोणे, लक्ष्मीनगर झोनचे चंद्रशेखर कांबळे, ग्रीन व्हिजीलफाऊंडेशनचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी, सुरभी जैस्वाल, मेहुल कोसुरकर, कल्याणी वैद्य, बिष्णुदेव यादव, राजश्री गुप्ता सहभागी झाले होते.

### शिक्षण सप्ताह विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविणारा - महापौर नंदा जिचकार

नागपूर : नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे दरवर्षी आयोजित शिक्षण सप्ताह विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविणारा ठरत आहे. क्रीडा स्पर्धांमुळे शारीरिक व्यायाम आणि सांस्कृतिक स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमधील कलागुणांना व्यासपीठ मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता शिक्षण सप्ताह पोषक ठरत असल्याचे प्रतिपादन महापौर नंदा जिचकार यांनी केले.मनपाच्या शिक्षण विभागातर्फे १४ ते २२ डिसेंबरदरम्यान आयोजित शिक्षण सप्ताहाअंतर्गत केंद्रीय स्पर्धांचे उद्घाटन बुधवारी (ता. १९) यशवंत स्टेडियम येथे सकाळी पार पडले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी मंचावर शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे, क्रीडा समितीचे सभापती नागेश सहारे, उपायुक्त राजेश मोहिते, शिक्षणाधिकारी संध्या मेडपल्लीवार, सहायक शिक्षणाधिकारी राजेंद्र सुके, कुसूम चापलेकर, क्रीडा अधिकारी नरेश सवाईथूल, क्रीटा निरीक्षक नरेश चौधरी उपस्थित होते. महापौर नंदा जिचकार पुढे बोलताना म्हणाल्या, मनपा शाळांचा शिक्षणाचा दर्जा उंचवावा यासाठी गेल्या काही वर्षांपासून विविध स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. शिक्षण सप्ताह हा त्या प्रयत्नांचाच एक भाग आहे. यंदाचे आयोजन हे आगळेवेगळे असून संपूर्ण शिक्षण विभाग अभिनंदनास पात्र असल्याचे सांगत सहभागी खेळाडूंना त्यांनी शुभेच्छा दिल्या. शिक्षण समितीचे सभापती प्रा. दिलीप दिवे यांनी शिक्षण सप्ताहाच्या सुंदर आयोजनाबाबत शिक्षण विभागाचे अभिनंदन केले. शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रात मनपाच्या शाळांची प्रगती होत असून मागील वर्षांपासून पटसंख्या वाढत आहे. बदलत्या काळानुसार मनपाच्या शाळाही बदलत असल्याचा उल्लेख करीत मनपाच्या शाळांतून शिक्षण घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### हॉकर्स अधिनियमासंदर्भात कार्यशाळेतून जनजागृती



नागपूर : रस्त्यावर व्यवसाय करून उदरनिर्वाह करणाऱ्या हॉकर्ससाठी तयार करण्यात आलेल्या जीविका संरक्षण व पथ विक्रेय अधिनियमासंदर्भात जनजागृती करण्यासाठी मंगळवारी (ता. १८) नागपूर महानगरपालिका समाज कल्याण विभाग, दीनदयाल अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान व नागपूर जिल्हा हॉकर्स संघाच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.यावेळी समाज कल्याण सभापती प्रगती पाटील, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, नागपूर जिल्हा हॉकर्स संघाचे अध्यक्ष जम्मु आनंद, पोलिस निरीक्षक (वाहतूक) जयेश भांडारकर, कॉन्फेडरेशन ऑफ असोसिएशन ऑफ इंडियन ट्रेडर्सचे अध्यक्ष बी.सी. भरतीया यांच्यासह विविध हॉकर्स संघटनांचे प्रतिनिधी प्रामुख्याने उपस्थित होते. हॉकर्सनी आपल्या हक्काची लढाई लढताना ती कायद्याच्या चौकटीमध्ये राहूनच लढावी. आपल्या स्वार्थासाठी उपयोग करणा–या लोकांच्या मागे न जाता अधिकारात राहून सामाजिक बांधिलकी जपा. कायदे, नियम तोडू नका, असे आवाहन यावेळी महिला व बालकल्याण समिती सभापती प्रगती पाटील यांनी केले.

## तलावांची स्वच्छता व सौंदर्यीकरणास नागरिकांचा पुढाकार आवश्यक - आमदार सुधाकर कोहळे



नागपूर : नद्या, सरोवरे व तलाव ही आपली संपत्ती आहे. तिची स्वच्छता व सौंदर्यीकरण हे आपले कर्तव्यच आहे. तलावांचे सौंदर्यीकरण व स्वच्छतेसाठी ही नागरिकांचा पुढाकार आवश्यक असल्याचे प्रतिपादन दक्षिण नागपूरचे आमदार सुधाकर कोहळे यांनी केले आहे. नागपूर महानगरपालिका, क्लिन फाऊंडेशन, पतंजली योग समिती, सोनझारी नगर मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी सक्करदरा तलाव येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.यावेळी महिला व बाल कल्याण समिती सभापती प्रगती पाटील, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती सभापती अभय गोटेकर, क्रीडा समिती सभापती नागेश सहारे, नेहरूनगर झोन सभापती रिता मुळे, हनुमाननगर झोन सभापती रूपाली ठाकूर, प्रतोद दिव्या धुरडे, नगरसेविका स्नेहल बिहारे, झोन सहायक आयुक्त हरिश राऊत, क्लिन फाऊंडेशनचे दीपक नीलावार, राजू नागुलवार, नामदेव फटिंग प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी बोलताना सुधाकर कोहळे म्हणाले, शहरातील सर्व नद्या व तलाव ही आपली संपत्ती आहे. ही स्वच्छ ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. नागरिकांच्या सहकार्यानेच तलावाची स्वच्छता ही शक्य आहे. सक्करदरा तलाव हे दक्षिण नागपूरचे भूषण आहे. दक्षिण नागपुरातील हा एकमेव तलाव स्वच्छ ठेवण्यासाठी या भागातील नागरिक नेहमी जागरूक राहतात. गणेशोत्सवाच्या काळात या तलावात एकही मूर्ती विसर्जीत झाली नाही. परंतू काही काळानंतर त्याठिकाणी जलपर्णी तयार झाली आहे. त्यातील जलपर्णी व गाळ काढण्याचे काम करून हा तलाव पूर्णपणे स्वच्छ करण्यात येणार आहे. परिसरातील सौदर्यीकरण व स्वच्छता यासाठीचा २७ कोटीचा प्रस्ताव हा शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. या प्रस्तावाचा मी स्व:ता पाठपुरावा करत आहे, असेही त्यांनी प्रतिपादित केले.



## मंगळवारी, आसीनगर झोन 'जनसंवाद'मधील तक्रारींचा पालकमंत्र्यांनी केला पाठपुरावा

नागपूर : नागपूर महानगरपालिकेंतर्गत मंगळवारी व आसीनगर झोनमध्ये घेण्यात आलेल्या 'जनसंवाद'मधील शासन स्तरावरील तक्रारींचा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पाठपुरावा केला. यासंबंधी शुक्रवारी (ता. २१) मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीमध्ये आयुक्त सभागृहात पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विविध तक्रारींसंदर्भात आढावा बैठक घेतली.बैठकीमध्ये महापौर नंदा जिचकार, मंगळवारी झोन सभापती संगीता गिऱ्हे, आसीनगर झोन सभापती वंदना चांदेकर, नगरसेविका विरंका भिवगडे, मंगला लांजेवार, भावना लोणारे, स्नेहा निकोसे, नगरसेवक मनोज सांगोळे, दिनेश यादव, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, राम जोशी, उपजिल्हाधिकारी रवींद्र कुंभारे, परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, सहायक पोलिस आयुक्त पी.एम.कार्यकर्ते, कार्यकारी अभियंता (स्लम) राजेंद्र रहाटे, कार्यकारी अभियंता (उत्तर) राजेश मेघराजानी, विभागीय अधिकारी (उत्तर) अनील राठोड, भूमी अभिलेख उपसंचालक बाळासाहेब काळे, नागपूर सुधार प्रन्यास, पोलिस विभागाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विद्यार्थ्यांसाठी बस, पट्टे वाटप, अतिक्रमण, भूमिगत गडर लाईन, ट्रंक लाईन, बोअरवेल, जीर्ण व्यापारी संकुलाचे नुतनीकरण आदींबाबतच्या समस्यांवर विस्तृत चर्चा करून त्या सोडविण्यासाठी संबंधित विभागाच्या अडचणी दूर करून त्वरित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. आसीनगर झोन अंतर्गत शाळा–महाविद्यालयांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी ये–जा करण्यासाठी तात्काळ बस सुविधा करण्याचे निर्देश दिले. याशिवाय झोनअंतर्गत येणाऱ्या कामठी मार्गावरील गुरूनानक महाविद्यालयाकडे जाणारा मार्ग अर्धवटच असल्याने विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागतो. या ठिकाणी कोणत्या दिशेने मार्ग पूर्ण करता येईल यासाठी नगरसेवकांसोबत दौरा करून त्याबद्दलचा अंतिम अहवाल १५ दिवसांत सादर करून लवकरात लवकर काम सुरू करण्याचेही निर्देशित केले.

## स्वयंरोजगार कर्ज प्रस्तावासंदर्भात राष्ट्रीयकृत बँकांची कार्यशाळा उत्साहात

नागपूर : दीनदयाल अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान स्वयंरोजगार कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांच्या कर्ज प्रस्तावासंदर्भातील संभ्रम व अडचणींवर चर्चा करून त्या सोडविण्याच्या उद्देशाने बुधवारी (ता. १९) नागपूर महानगरपालिका समाज कल्याण विभाग व दीनदयाल अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान यांच्या वतीने राष्ट्रीयकृत बँकांची एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.महाल येथील नगर भवन येथे आयोजित कार्यशाळेमध्ये उपायुक्त रंजना लाडे, बँक ऑफ इंडियाचे निवृत्त वरिष्ठ प्रबंधक श्रीराम बांधे, स्टेट बँक ऑफ इंडियाचे जिल्हा समन्वयक नुकेतन गजभिये, युनियन बँक ऑफ इंडियाचे जिल्हा समन्वयक भारत मेश्राम यांच्यासह विविध बँकांचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी उपायुक्त डॉ. रंजना लाडे, बँक ऑफ इंडियाचे निवृत्त वरिष्ठ प्रबंधक श्रीराम बांधे, स्टेट बँक ऑफ इंडियाचे जिल्हा समन्वयक नुकेतन गजभिये, युनियन बँक ऑफ इंडियाचे जिल्हा समन्वयक भारत मेश्राम यांनी शासनाच्या विविध योजना लाभार्थ्यांच्या कर्ज प्रस्तावाबाबतचे संभ्रम, येणाऱ्या अडचणी आदींची चर्चा करून उपस्थित बँक प्रतिनिधींच्या शंकांचे निरसन केले. प्रास्ताविकात उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांनी कार्यशाळेचा उद्देश स्पष्ट केला. सरकारच्या योजनांबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेली उदासीनता दूर करणे तसेच नागरिकांचा विश्वास दृढ करण्याच्या हेतूने नागपूर महानगरपालिका व राष्ट्रीयकृत बँक यांनी योग्य समन्वय साधून काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बँक ऑफ इंडियाचे निवृत्त वरिष्ठ प्रबंधक श्रीराम बांधे यावेळी म्हणाले, गरीब लोकांना स्वावलंबी बनवून त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या उद्देशाने दीनदयाल अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाद्वारे स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यात येते. लोकांचा आर्थिक स्तर वाढावा, त्यांच्यातील कौशल्याला एक दिशा मिळावी यासाठी शासनाने पुढाकार घेतला असताना त्यांना आर्थिक सहाय करणे हे बँकांचे कर्तव्य आहे. कर्ज प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले सर्व कागदपत्रे तयार असणाऱ्यांना त्वरित कर्ज मंजूर करून शासनाच्या योजनेला सहकार्य करा, असे आवाहनही श्रीराम बांधे यांनी यावेळी केले..



## हास्य कवी संमेलनाने रसिक मंत्रमुग्ध

नागपूर : एक भूत ने दुसरेसे कहा की, आदमीयोसे बचकर रहना चाहिये, यह बढे खतरनाक होते है. अशा भन्नाट व्यंग कवितेने रसिकांना मंत्रमुग्ध केले. निमित्त होते नागपूर महानगरपालिका प्रभाग क्र.१५ यांच्यातर्फे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मदिनाच्या पूर्वसंध्येला अखिल भारतीय हास्य व्यंग कवि संमेलनाचे आयोजन धरमपेठ येथील ट्रॅफिक चिल्ड्रेन पार्क येथे करण्यात आले.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी खासदार अजय संचेती, आमदार प्रा.अनिल सोले, गिरिश व्यास, ज्येष्ठ नगरसेवक दयाशंकर तिवारी, स्थापत्य व प्रकल्प समिती सभापती संजय बंगाले, नगरसेवक निशांत गांधी, नगरसेविका रूपा राय, उज्वला शर्मा, झोन सहायक आयुक्त महेश मोरोणे, माजी न्यायमूर्ती विकास शिरपूरकर, भाजपाचे माजी संघठनमंत्री अरविंद शहापूरकर प्रामुख्याने उपस्थित होते. या कविसंमेलनात ओमपाल सिंह निडर (फिरोजाबाद), मनोज मद्रासी (निजामाबाद), दयाशंकर तिवारी (नागपूर), प्रा.कपील जैन (यवतमाळ), लोकेश जडीया (धार), संचालन डॉ.निरज व्यास यांनी केले. या कवीसंमेलनात मान्यवर कविंनी राजकीय, सामाजिक, पर्यावरण आदी विषयांवर कविता सादर केल्या. वर्णभेदाच्या कवितेवरून मनोज मद्रासी यांनी रसिकांना खिळवून ठेवले. लोकेश जडीया यांच्या पर्यावरणावरील तसेच सामाजिक प्रबोधनात्मक दारूबंदीच्या कवितेंनी रसिक मंत्रमुग्ध झाले. ओमप्रकाश निडर यांनी सांस्कृतिक समाजव्यवस्थेवर प्रकाश टाकणा–या हास्य व्यंग कविता सादर केल्या. प्रारंभी कवि संमेलनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. मान्यवरांचे स्वागत नगरसेवक संजय बंगाले आणि प्रभाग अध्यक्ष अमर पारधी यांनी केले. या कविसंमेलनाला मार्गदर्शन करताना माजी खासदार अजय संचेती म्हणाले, अटलजींच्या कविता या मनाचा वेध घेतात. अटलजींच्या कवितेमुळे एक नवीन ऊर्जा मिळते. अटलजींच्या कविता नेहमीच आम्हा सर्वांसाठी प्रेरणादायी ठरेल,

## पालकमंत्र्याच्या जनता दरबारातील तक्रारींचा महापौरांनी घेतला आढावा

नागपूर : पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे यांनी जनतेच्या समस्या जाणून घेण्यासाठी झोननिहाय जनता दरबार कार्यक्रम हाती घेतला आहे. सोमवारी (ता.३१) महापौर नंदा जिचकार यांनी लकडगंज, आसीनगर व मंगळवारी झोनमध्ये आलेल्या तक्रारींचा आढावा मनपा मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात घेतला.यावेळी महापौर नंदा जिचकार यांच्यासमवेत आयुक्त अभिजित बांगर, उपनेत्या वर्षा ठाकरे, महिला व बालकल्याण समिती सभापती प्रगती पाटील, लकडगंज झोन सभापती दीपक वाडीभस्मे, आसीनगर झोन सभापती वंदना चांदेकर, मंगळवारी झोन सभापती संगिता गिऱ्हे, नगरसेवक मनोज सांगोळे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, कार्यकारी अभियंता (विद्युत) संजीव जयस्वाल, कार्यकारी अभियंता गिरिश वासनिक, आरोग्यधिकारी डॉ.सुनील कांबळे, पशुचिकित्सक डॉ.गजेंद्र महल्ले, झोन सहायक आयुक्त सर्वश्री गणेश राठोड, सुभाष जयदेव, हरिश राऊत, विजय हुमने, बाजार विभागाचे श्री. उमरेडकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.विजय जोशी, संबंधित झोनचे झोनल अधिकारी, ओसीडब्ल्यूचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी महापौर नंदा जिचकार यांनी तिन्ही झोनच्या प्रभागनिहाय तक्रारी वाचून दाखवत त्यावर अधिकाऱ्यांनी कोणती कार्यवाही केली याचा आढावा घेतला. मोकळ्या भूखंडावर कचरा साचून आहे, त्या भूखंडधारकांना नोटीस बजावण्यात यावा आणि त्यांच्यावर दंड आकारण्यात यावा, असे निर्देश महापौरांनी दिले. काही भूखंड हे नासुप्रच्या अखत्यारित असल्याने त्याबाबत नासुप्रशी पत्रव्यवहार करावा, असेही महापौर नंदा जिचकार यांनी सांगितले. लकडगंज झोनमधील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यलयातून कचरा जाळण्यात येतो अशी तक्रार होती. यावर कृषी उत्पन्न बाजार समितीला नोटीस बजावण्यात आला आहे. याशिवाय ५० हजार रूपयांचा दंड आकारण्यात आला असल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली. झोनमधील पथदिवे, रस्ते दुरूस्तीच्या तक्रारींचा आढावा महापौरांनी अधिकाऱ्यांमार्फत घेतला. आसीनगर झोनमधील पिवळी नदीवर संरक्षक भिंत बांधण्याच्या तक्रारीचा आढावा महापौरांनी घेतला. याशिवाय आसीनगर आणि मंगळवारी झोनमधील पथदिवे, अतिक्रम, गडरलाईन समस्या, पिण्याच्या पाण्याचा समस्या, स्वच्छतेसंदर्भातील तक्रारींचा आढावा घेतला. सर्व समस्या लवकरात लवकर सोडविण्यात याव्यात, असे निर्देश महापौर नंदा जिचकार यांनी दिले.